लोकमत कोल्हापूर, रविवार, दि. २१ ऑक्टोबर २०१८

महासागरीय संपत्तीचे जतन गरजेचे

अनिलराज जगदाळे : विवेकानंद महाविद्यालयातील कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पृथ्वीचा ७५ टक्के भूभाग महासागराने व्यापलेला असून त्यात विविध जलचर आणि वनस्पती आहेत. महासागराच्या पाण्याचा मुख्य स्रोत पाऊस आहे. हा नैसर्गिक स्रोत वातावरणातील बदलाने प्रदूषित झाला, तर त्याचा महासागरातील जलचरांबरोबरच मानवी जीवनावर देखील परिणाम होईल. त्यासाठी महासागरीय साधनसंपत्तीचे जतन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन भारतीय जलसंस्कृती मंडळाचे डॉ. अनिलराज जगदाळे यांनी येथे केले.

कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयातील कार्यशाळेत भारतीय जलसंस्कृती मंडळाचे डॉ. अनिलराज जगदाळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी एस. वाय. होनगेकर, आदी उपस्थित होते.

विवेकानंद महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. 'अंडरस्टँडिंग द थ्री फोर्थ ऑफ दि अर्थ (ओकेन)' असा या कार्यशाळेचा विषय होता. प्राचार्य होनगेकर म्हणाले, पृथ्वी वाचवली तरच जीवसृष्टी टिकेल. यासाठी महासागरात असलेल्या जीवसृष्टीचा अभ्यास करून माणसाने ती टिकविण्यासाठी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. पृथ्वीचे तापमान योग्य राखण्यासाठी जंगलसंपत्ती वाढविणे ही गरजेचे आहे.

या कार्यशाळेसाठी डॉ. राजू निगम, रणधीर मुखोपाध्याय, ॲन्थोनी जोसफे, आदी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या विवेक न्यूज अंकाचे प्रकाशन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते झाले. या अंकाचे संपादन डॉ. दीपक तुपे यांनी केले आहे.

कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. शुभांगी काळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले.

पुढारी
रविवार
२१ ऑक्टोबर २०१८

'विवेकानंद'मध्ये सौंदर्य व व्यक्तिमत्त्व विषयावर व्याख्यान

कोल्हापूर (प्रतिनिधी) : विवेकानंद कॉलेजमध्ये सचेतना समितीमार्फत विद्यार्थिनींसाठी सौंदर्य व व्यक्तिमत्त्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सौंदर्याच्या गुजगोष्टी करताना मुलींच्या वाढत्या वयातील आहार, विहार, व्यायाम, जीवनशैली, निरोगी त्वचा, शरीराचे बाह्यसौंदर्य, पोशाख, एकूण व्यक्तिमत्त्व, देहबोली या विषयावर डॉ. नीता नरके यांनी मुलींना मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. माधवी चरणकर, प्रा. राजश्री पाटील, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. सुनीता शिर्के, डॉ. मंजुश्री घोरपडे, डॉ. प्रभावती पाटील, डॉ. शुभांगी काळे, प्रा. नाजनीन पटेल आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । रविवार, २१ ऑक्टोबर २०१८

विवेक न्यूज अंकाचे प्रकाशन

कोल्हापूरः शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त विवेकानंद कॉलेजच्या विवेक न्यूज अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी जलसंस्कृती मंडळाचे संचालक डॉ. अनिलराज जगदाळे, डॉ. राजू निगम, रणधीर मुखोपाध्याय, अँथोनी जोसेफ आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, कार्यकारी संपादक डॉ. दीपक तुपे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या अंकाचे संपादन केले. या अंकात 'बापूजी साळुंखे यांच्या शिक्षणाचा ध्यास', 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव... काळाची गरज', 'पर्यावरण व मानवी जीवन' या विषयावरील लेखांचा समावेश आहे. mr

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । रविवार, २१ ऑक्टोबर २०१८

एक कोटी ९७ लाख नफा

कोल्हापूर : विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्थेस एक कोटी ९७ लाख रुपये नफा झाल्याची माहिती अध्यक्ष उत्तम गलांडे यांनी दिली. ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. अध्यक्षस्थानी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. सभासदांना ११ टक्के लाभांश देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सचिव संपतराव वेटाळे यांनी अहवाल केले. उपाध्यक्ष शशीराव शेंडगे यांनी आभार मानले. यावेळी माजी सहसचिव आर. के. भोसले, अजीव सेवक प्रा. भूपाल कुंभार उपस्थित होते.